MHAU120009892025

**नियमित दिवाणी दावा क्र.–१३०/२०२५**
**राजेंद्र वि. युवराज आणि इतर**

## निशाणी क्र.१९ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१, २ व ४ यांनी त्यांच्याविरोधात झालेला लेखी म्हणणे नाहीचा आदेश तसेच नि. क्र. १४ वरील आदेश बाजूस सारण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादींनी सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले की, त्यांचे विधीज्ञ हे आजारी असल्याने ते सदर दाव्याकामी हजर होऊन मुदतीत कैफियत व नि. क्र.१४ च्या अर्जास खुलासा सादर करु शकले नाहीत. तरी त्यांचे म्हणणे मा. न्यायालयासमोर येणे महत्वाचे आहे, अन्यथा त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द झालेला वरील नमुद आदेश बाजूस सारुन मिळण्याची विनंती केलेली आहे.

**०३.** वादीने नि. क्र.२३ वर त्याचे म्हणणे दाखल केले. प्रतिवादी यांनी सदरच्या अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तीक नाही. वकीलांचे दिलेले कारण हे कायदयाने संयुक्तीक ठरत नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०४** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, प्रतिवादीचे विधीज्ञ हे आजारी असल्यामुळे न्यायालयात हजर राहु शकले नाही असे कारण अभिलेखावर आलेले आहे. त्याकामी वैद्यकीय कागदपत्रं अभिलेखावर दाखल केलेले आहेत. जरी वादींच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादीचे विधीज्ञांचे कारण हे कायदयाचे दृष्टीने संयुक्तीक नसले तरी प्रतिवादींना संधी दिली तर वादींचे काय नुकसान होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर नाही. शिवाय, सदर प्रकरणात मोठया प्रमाणावर विलंब झाल्याचे दिसून येत नाही. मात्र, लेखी खुलासा पटलावर न घेतल्यास दाव्याचा निर्णय गुणांणवर होणार नाही. सबब, प्रतिवादी यांचा लेखी जबाब पटलावर असणे आवश्यक आहे. तसेच सदर अर्ज मंजूर करीत असताना, वादीला खर्चाची रक्कम देणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रुपये ४००/– च्या कॉस्टवर मंजुर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी यांच्याविरुध्द झालेले आदेश, हा बाजुस सारण्यात येतात.

०३. सदर कॉस्ट प्रतिवादींनी वादी यांना द्यावी.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.04.15 15:35:46 +0530

[एम. बी. पाटील]

दिनांक :–१५.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,

सोयगांव.